# युरिया गोल्ड : शेतकऱ्यांसाठी नवीन प्रकारचा युरिया

डॉ. रोहित शेलार
सहाय्यक प्राध्यापक
कृषि विस्तार शिक्षण विभाग
कै. रा. म. कृषि महाविद्यालय, फोंडाघाट

मनीषा लवणकर
आचार्य पदवी विद्यार्थिनी
कृषि विस्तार शिक्षण विभाग
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

प्रा. अक्षय ढेंगळे
सहाय्यक प्राध्यापक
कृषि विस्तार शिक्षण विभाग
मा. वा. कृषि महाविद्यालय, यवतमाळ

शेतमालाच्या अधिक उत्पादनासाठी वापरण्यात येत असलेल्या युरियामुळे जमिनीचा पोत घटत चाललेला आहे. सद्या वापरत असलेल्या युरियाचा पर्यावरणावर विपरित परिणाम देखील होत आहे. या बाबींना आळा घालून शेतकरी बांधवांचा खताचा खर्चात बचत व्हावी या हेतूने शेतकरी हितार्थ केंद्र सरकारने ३१ जुलै २०२३ रोजी युरिया गोल्ड प्रयोगात आणले आहे.



## युरिया गोल्ड काय आहे?

युरिया गोल्ड हे एक सल्फर कोटेड युरिया (SCU) म्हणजेच गंधक लेपित युरिया आहे म्हणून याला सल्फर युरिया असेही म्हणतात. युरिया गोल्ड हे जमिनीतील गंधक कमतरतेवर मात करण्यासाठी तयार केलेले आहे, युरिया गोल्डचा मुख्य उद्देश जमिनीत सल्फरची कमतरता भरून काढणे आणि शेतकऱ्यांसाठी लागवड खर्च कमी करणे हा होय. युरिया गोल्ड हा एक सल्फर युक्त युरिया असून त्यामध्ये नत्राचे प्रमाण हे ३७ टक्के व गंधकचे प्रमाण १७ टक्के आहे.

हे खत जमिनीला हळूहळू नत्र पुरवण्याचे कार्य करते त्यामूळे नत्र गमावण्याचा धोका कमी होतो आणि संपूर्ण वाढत्या हंगामात पिकांमध्ये नत्राचा स्थिर पुरवठा सुनिश्चित होतो. ह्या खतामध्ये गंधक आहे. जे वनस्पतींसाठी एक आवश्यक पोषकतत्व आहे. गंधक वनस्पतीचा वाढीस चालना देतो, उत्पादन क्षमता देखील वाढवते. तसेच गंधक कीटक आणि रोगांपासून बचाव करण्याकरीता वनस्पतीची प्रतिकार क्षमता वाढविण्याचे कार्य करते.

युरिया गोल्ड खतामध्ये ह्युमिक ऍसिड देखील आहे, जे एक नैसर्गिक पदार्थ आहे त्यामुळे मातीचे आरोग्य सुधारते. तसेच ह्युमिक ऍसिड मातीचे कण एकत्र बांधते, त्यामुळे पाणीधारण करण्याची क्षमता आणि पोषक तत्वांची उपलब्धता वाढते. ह्युमिक ऍसिड हे जैव उतेजक व माती सुधारकतेचे कार्य करते.

युरिया गोल्ड हे खत विविध पिकांसाठी वापरले जाऊ शकते, जसे की तांदूळ, गहू, मका, भाज्या आणि फळे. तसेच हे खत सिंचित आणि कोरडवाहू शेती दोन्हीसाठी योग्य आहे. युरिया गोल्ड हे खत तंत्रज्ञान क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण विकास आहे. त्या पारंपारिक युरियापेक्षा अनेक फायदे आहेत.

## युरिया गोल्डचे काही महत्त्वाचे फायदे खालीलप्रमाणे आहेत:

- **सुधारित युरियाचा वापर:**

गंधक लेपित युरिया हे खत जमिनीला हळूहळू नत्र पुरवण्याचे कार्य करते, ज्यामुळे पिकांसाठी नत्र जास्तीत जास्त उपलब्ध होऊन पिकांद्वारे अधिक प्रमाणात शोषले जाते. यामुळे बाष्पीकरणामुळे नत्र गमावण्याचा धोका देखील कमी होतो आणि ते पिकांना जास्त नत्राच्या नुकसानापासून देखील वाचवन्यास मदत करते.

- **खताचा कमी वापर:**

१५ किलो युरिया गोल्ड २० किलो पारंपारिक युरियाच्या तुलनेत समान फायदा देते. याचा अर्थ शेतकरी समान परिणाम साध्य करण्यासाठी कमी प्रमाणात खत वापरू शकतात, ज्यामुळे खर्चात बचत होऊन पर्यावरणाचे देखील संरक्षण होते.

- **दीर्घ आयुष्य:**

युरिया गोल्डमध्ये ह्युमिक ऍसिडचा समावेश केल्याने युरिया गोल्डचे खत म्हणून आयुष्य आणखी वाढते. याचा अर्थ ते दीर्घ काळासाठी साठवले जाऊ शकते आणि त्याचा प्रभाव गमावू शकत नाही.

- **पिकांची गुणवत्ता:**

प्रयोगामध्ये युरिया गोल्डने पिकांमध्ये गुणवत्ता सुधारते असे आढळून आले आहे. यामुळे त्यांची उत्पादन क्षमता, पोषकतत्व, कीटकांपासून आणि रोगांपासून प्रतिकार शक्ति वाढविण्यास मदत होणार होते.

एकंदरीत, युरिया गोल्ड हा शेतकरी बांधवांसाठी महत्त्वपूर्ण लाभ देऊ शकणारा एक आशाजनक नवीन युरियाचा प्रकार आहे. तो पारंपारिक युरियापेक्षा अधिक कार्यक्षम, प्रभावी आणि किफायतशीर आहे आणि त्याची पिकांची गुणवत्ता आणि उत्पादकता वाढविण्यास मदत होणार आहे.

(संपर्क: +९१ )

★ ★ ★